Impact Factor Value :

ISSN : 2278-9308

# Sanshodhan Samiksha

Humanities, Social Sciences, Commerce,
Education, Law and Language
Monthly Peer Reviewed International Research Journal

## October-2016




Chief Editor - Prof. Virag S. Gawande
Editor - Dr. Sanjay J. Kothari
Editor - Dr. Dinesh W.Nichit

- Published By -

AADHAR SOCIAL RESEARCH & DEVELOPMENT TRAINING INSTITUTE, AMRAVATI, MS.

R.N.I- MAH-R-38527

I S S N- 2278-9308

# Sanshodhan Samiksha

Humanities,Social Sciences,Commerce, Education, and language& Law Monthly

Peer Reviewed International Research Journal

Special Issue

October – 2016

**Chief Editor**
**Prof.Virag S.Gawande**

**Editor**
**Dr.Sanjay j. Kothari**
**Social Sciences**

**Editor**
**Dr. Dinesh W.Nichat**
**Commerce**

**Published By**

Aadhar Publication – Amravati

( M.S.) India 444604

**Sanshodhan Samiksha**
Humanities,Social Sciences,Commerce, Education, and language
Monthly Peer Reviewed International Research Journal
Special Issue

**Chief Editor**
Prof.Virag Gawande
Director,
Aadhar Social Research &
Development Training Institute, Amravati.

**Editor**
Prof.Dr.Sanjay j. Kothari
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar
Dist. Amravati

**Editor (Commerce )**
Prof.Dr.Dinesh W.Nichit
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage Walgaon
Dist. Amravati

**©Publisher**
All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or any means without permission. Any person who does any unauthorized Act in relations to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.The facts, figures and views contained in various papers and abstracts being published in this book are obviously given by the authors of the papers. The editors are not responsible for the statements made or the opinions expressed by the authors.

**Date of Publication :**

**5, October , 2016**

**ISSN - 2278-9308**

**Published By:B.**Aadhar Peer Reviewed International Research Journal &Aadhar Publication & Aadhar Social Research & Development Training Institute, New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College,Amravati ( M.S ) India Pin- 444604
9595560278, Emial: aadharpublication@gmail.com

Price : Rs 200 /-

# INDEX

## SECTION (A) - Marathi


| | | | |
|---|---|---|---|
| 1 | प्रा.अनिल प्रभाकर निकम | कर्मविर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा | 1 |
| 2 | प्रा. डॉ. रमेश मो. बावनकुळे | पौनी तालुक्यातील भात लागवडी क्षेत्र व भात सडण्याच्या गिरण्या यातील अभिक्षेत्रीय संबंधाचे भौगोलिक विश्लेषण | 3 |
| 3 | प्रा. एम.एल. भुसारे | दलित व ग्रामीण साहित्यातील स्त्री चित्रण | 20 |
| 4 | प्रा. डॉ. अरविंद शेंडे<br>लक्ष्मी गोपालजी चरपे | नागपूर जिल्हयातील संत्रा उत्पादकांच्या वित्तीय स्थितीचे अध्ययन (कालखंड 2007–2016) | 23 |
| 5 | डॉ. प्रल्हाद एस धोटे | ग्रामसभा आणि गावाचा विकास | 29 |
| 6 | प्रा. अर्चना ना. धर्मे | स्त्री आणि शिक्षण | 34 |
| 7 | प्रा.डॉ.जुगल वासुदेवराव धोटे | औद्योगिकीकरणाचे पर्यावरणावर परिणाम आणि मानवी जीवनसुरक्षा | 38 |
| 8 | प्रा.डॉ.सुरेश बन्सपाल | ध्वनी प्रदूषण एक अध्ययन | 47 |
| 9 | प्रा. मधुकर आत्माराम देसले | वृध्दाच्या समस्या, कारणे आणि उपाययोजना | 51 |
| 10 | प्रा. डॉ. केशव सुर्यभानसा गुल्हाने | अमरावती विभागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबत अध्ययन | 56 |
| 11 | कु. सारिका संतराम पाचरणे | दीनमित्रकार मुकुंदराव पाटील : बहुआयामी व्यक्तिमत्व | 61 |
| 12 | प्रा.डॉ.संभाजी गावडे | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य | 64 |
| 13 | डॉ. विकास ज. पवार, | कृषी विपणन – सद्यस्थिती ( महाराष्ट्र राज्या संदर्भात ) | 71 |
| 14 | श्री. प्रमोद हरिभाऊ पौनिकर | रिक्षा : एक महागाथा | 76 |
| 15 | प्रा. विनोदकर विजयकुमार सुरेंद्र | बदलत्या पर्यावरणाचा दारिद्रय, बेकारी व स्थलांतराव झालेला परिणाम | 80 |
| 16 | डॉ. वीणा वा. लाडे | बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील ग्रामिण जीवनाचे वास्तव दर्शन – एक अभ्यास | 88 |
| 17 | प्रा. शुभदा शिवपूजे - उपासे | महात्मा बसवेश्वरांचे जाती निर्मुलन विषयक विचार व कार्य | 93 |
| 18 | डॉ. पी. एम. टाले | बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण | 98 |
| 19 | प्रा.रिता रामजी राऊत<br>डॉ.एच.एम.कामडी, | गोंदिया जिल्ह्यातील बंगाली श्रमिकांचे शेतीविषयक आर्थिक अध्ययन | 101 |
| 20 | प्रा.प्रदिप भा.मेश्राम | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची उर्जा विषयक दिव्यदृी | 109 |
| 21 | प्रा. डॉ. जयंत डी. पोरे | स्मार्ट सिटी आणि डिजीटल इंडिया | 112 |

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | डॉ.निलेश र.निंबाळकर | पंचायत राज संस्थामधील महिलांचे स्थान | 114 |
| 23 | प्रा. राजेश पां. मेश्राम | मेळघाट प्रदेशातील लोकसंख्या वितरणाचे अध्ययन : (१९९१ ते २००१) | 122 |
| 24 | डॉ. मधुकर नारायण गोसावी | महाराष्ट्रातील धार्मिक उत्सव आणि बिघडलेल्या ग्रामीण सार्वजनिक आरोग्य सेवेचे अर्थशास्त्र | 126 |
| 25 | प्रा. राजु के. माटे | कौटुंबिक हिंसा : स्त्रियांचे संरक्षण आणि शासकिय व अशासकिय संस्थांची भुमिका | 132 |
| 26 | प्रा.तक्षशिला मोटघरे | पारधी समाज : पालकांचा शैक्षणिक दृष्टीकोन व सद्यःस्थिती | 136 |
| 27 | प्रा.गौतम बाबुलाल थोरात | केशव मेश्रामांच्या कादंबऱ्या : आशय आणि आकलन | 142 |
| 28 | प्रा.डॉ. डी.जी. पाटील | नंदुरबार जिल्हयातील आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन विशेष संदर्भ : ठाणेपाडा | 149 |
| 29 | प्रा. डॉ. सावंत नितीश पांडुरंग | दलित कथा - निवडक कथाकारांच्या अनुषंगाने | 155 |


# INDEX

## SECTION (B) - ENGLISH


| | | | |
|---|---|---|---|
| 30 | Dr. Raju G. Shrirame | Oil Processing Industries & Employment Opportunities in Vidarbha Region | 1 |
| 31 | Rajesh s. Pawara | A study on educational environment in India | 7 |
| 32 | Mrs. Sunita Shivaji Patil. | Networks types and network topologies | 12 |
| 33 | Mrs. Varsha Raghunath Shinde | WTO its Impact on the different sectors on the economy and Working areas. | 20 |
| 34 | Vijaysing .B .Pawar | The role information technology industry in india | 27 |
| 35 | Faizan Anees Ahmed | Constitutional validity of narco analysis test in india with specific reference to judicial decisions | 31 |
| 36 | Prashant K.Jambhule | Waterpollution in India: some facts about river pollution | 39 |
| 37 | Dr. Dhumal A. M. | Role and Functions of RBI in Banking Sector | 43 |
| 38 | Mr. S. B. Shinde | Green Banking : Ethical, Social and Sustainability Dimension | 46 |
| 39 | Prof. Salke Sunil Ramrao | Role of Ethics in Business | 50 |
| 40 | Dr. Smita Wadaskar | Investing in Indian Tourism | 54 |

ISSN - 2278-9308

# दलित कथा - निवडक कथाकारांच्या अनुषंगाने

प्रा. डॉ. सावंत नितीश पांडुरंग
मराठी विभाग प्रमुख जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर ता. शिरोळ जि. कोल्हापूर ४१६१०१

साहित्य आणि समाज यांचा जवळचा संबध आहे वेगवेगळ्या कालखंडात लिहीणारे लेखक ही त्या काळची आपत्ये असतात. तो कालखंड समजावून घेतला तर त्या लेखकाने केलेल्या साहित्य निर्मितीचे आधिक चांगले आकलन होऊ शकते. मनुष्य जीवनाला प्रेरणा देणारी साहित्य ही एक जबरदस्त शक्ती आहे. या संदर्भात कालेकर द.बा. हे आपल्या 'साहित्याची कामगिरी' या पुस्तकात म्हणतात, "धीरोदात्त किंवा उत्कट जीवनावाचून भावोत्कट साहित्य कदापि तयार होणार नाही. पराक्रम तो मग स्वतःचा असो किंवा दुसऱ्याचा असो, किंवा बाह्य घटनेतील असो किंवा समाजगत असो. पराक्रम हाच साहित्याला खरी प्रेरणा देणारा आहे".[१] म्हणजेच साहित्य निर्माण होण्यासाठी जीवनात काही ना काही पराक्रम घडावा लागतो. त्या पराक्रमामुळे साहित्याला प्रेरणा मिळते. जीवनाच्या व्याकुळ वेदनांतून देखील साहित्य निर्माण होते. ही वेदना म्हणजे पराक्रमाची प्रसव वेदनाच असते. ती साहीत्याला प्रेरक असते. सामाजिकतेशिवाय साहित्य आणि साहित्यीक संभवत नाहीत. या संदर्भात द.दि. पुंडे व स्नेहल तावरे यांचे मत या ठिकाणी नोंदवावेसे वाटते ते म्हणतात की, "कवी लेखक समाजात निर्माण झाले नसते तर समाजाच्या सांस्कृतिक परंपरेची शब्दरुपी धनसंपदा कुणी निर्माण केली असती? समाज केवळ भक्तीवर जगत नाही तर तो भाषिक निर्मीतीही जगत असतो."[२] समाजाला जगण्यासाठी केवळ भाकरीची आवश्यकता नाही तर साहित्याची देखील आवश्यता असते.

मानवी जीवन हा साहित्याचा केंद्रबिंदू आहे. मानवाच्या विवीध प्रेरणा, राग, लोभ, भावभावना, वृत्ती प्रवृत्ती सामाजिक संबधातील त्यांची विविध रुपे आणि त्यांचे ताणतणाव विचार, विकार विशीष्ठ परिस्थितीत त्यांची जगण्यासाठी चाललेली धडपड आणि नैसर्गिक भावनांचे प्रकटीकरण इ. गोष्टींचे सुक्ष्म अणि ह्दयद्रावक चित्रण साहित्यात येत असते. लेखक ज्या समाजात जन्माला येतो त्या समाजाच्या काही प्रथा प्रंपरा असतात त्या समाजातील धर्मकल्पना, रुढी, तत्त्वप्रणाली, आचारविचार, संकेत, शिष्टाचार इ. सर्वांमधून त्याची व समाजाची जीवन जगण्याची पद्धती निश्चीत झालेली असते.

दलित साहित्य हा १९६० नंतर मराठी वाङ्मयात निर्माण झालेला एक महत्वाचा प्रवाह म्हणून आपण त्याच्याकडे पाहतो. वाङ्मयात नवनवीन प्रवाह नेहमीच होत असतात. सर्वसामान्यपणे जीवनात परिवर्तन झाले की त्याचे साद पडसाद वाङ्मयातही होतात. स्वातंत्र्यानंतर मराठी माणसाच्या जीवनाच्या विवीध क्षेत्रात अतिशय जलद गतीने परिवर्तन झाले. दलित साहित्याचा प्रवाह हा परिवर्तनाच्या चळवळीतून उदयाला आला. जीवनाची बांधीलकी मानणारे दलित साहित्य आहे जीवनातल्या वास्तव प्रश्नांना हे साहित्य सामोरे जाते. म्हणून व्यापक अर्थाने हे जीवनदायी साहित्य आहे. दलित साहित्यातील जीवनवादाला महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे अधिष्ठान आहे. या संदर्भात प्रल्हाद जी लुलेकरांचे विचार या ठिकाणी व्यक्त करावेसे वाटतात ते म्हणतात "डॉ. आंबेडकरांच्या 'सम्यक क्रांतीच्या' लढ्यातून दलित साहित्याचा प्रारंभ झाला. ह्या साहित्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. अन्य चळवळीच्या परिणामातूनही या साहित्याला परिमाण लाभले हे ही खरे आहे. मार्क्सवादी चळवळींचा ह्यामध्ये समावेश होतो".[३] दुसरे विचारवंत अविनाश सहस्त्रबुद्धे म्हणतात," डॉ. आंबेडकरांच्या आंदोलनांमुळे दलित समाजात नवचैतन्य संचारले. क्षमायाचनेची वृत्ती नष्ट होऊन त्यांचा स्वाभिमान जागृत झाला व आपल्या हक्कांसाठी झगडण्याची प्रेरणा त्यांना मिळाली प्रकाश कुंभार यांचे या संदर्भातील विचार महत्त्वाचे आहेत ते म्हणतात, "दलित साहित्य सर्वसामान्य साहित्यानिर्मित प्रमाणे

मनोरंजनासाठी घटकाभराच्या करमणूकीसाठी निर्माण झालेला नाही कारण दलित साहित्य हे समाज व विचार व्यवस्थेतून निर्माण झालेले वेदना पीडांना, सुख दुःखांना, आशा आकांक्षांना दुरावस्थांना शब्दरुप देते. इतकेच नव्हे तर कालच्या साहित्यात मी नव्हतो ते माझे नाही हे आजच्या दलित साहित्याने दलित माणसांना सांगितले."[४]

स्वातंत्र्योत्तर काळात ज्या नव्या वाङ्मयीन जाणीवा व प्रवृत्ती मराठी साहित्यात आपल्या खुणा उमटवू लागल्या त्यात दलित साहित्याचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाने दलित अनुभवाला जाग आली. शतकानूशतकांच्या मौनाला वाचा फुटली पोथीनिष्ठ, अंधश्रद्धा, देव व दैवशरणता यांनी तुडविलेले मानवी मन नव्या विज्ञाननिष्ठ हुकारांनी सजग झाले. दलित कथेच्या प्रेरणा आणि प्रवृत्तीची पार्श्वभूमि विषद करताना प्रा चंद्रकुमार नलगे, गंगाधर पानतावणे म्हणतात की, "जीवन जाणीवा कोंडीतून मुक्त होऊन नवा आशय आविष्कृत होऊ लागला हा नवा आत्मशोध होता. ही नवी सांस्कृतिकता होती. अस्मितेचा हा नवा उद्गार होता याचे नाव दलित साहित्य भारतीय संस्कृतीच्या तळाशी पेटलेले हे अग्निकुंड आहे. दलित कथा ही या अग्निकुडांतील एक ठिणगी आहे. मराठी कथावेलीला आलेले ते एक रसरशीत फळ आहे."[५] दलित कथा सामाजिक चळवळीतून उदयाला आली आहे दलित शाहीर, दलित कवी, दलित आत्मकथाकार दलित कथाकार, दलित कादंबरीकार, दलित नाटककार, दलित विचारवंत इत्यादिंचा उदय दलित चळवळीतून झाला. या संदर्भात सदा कऱ्हाडे म्हणतात की, "स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राजकीय लोकशाही आस्तित्वात आली परंतू डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली समता, स्वातंत्र्य बंधुता, सामाजिक न्याय यावर आधारलेली सामाजिक लोकशाही अस्तित्वात आली नव्हती."[६] सवर्णाची मानसिकताही बदलली नव्हती. धर्मांतर केल्यामुळे अस्पृश्यांची हिंदूधर्माच्या गुलामगिरीतुन मुक्तता झाली नव्हती अन्याय, अत्याचार उपेक्षा, अवहेलना वंचना हे या ना त्या रुपात चालूच होते. अशा अवस्थेत दलितांच्या संवेदना, भावना स्फोटक बनून उद्रेका सारख्या फूटू लागल्या आणि १९६० च्या आसपास दलित साहित्य आपले रुप घेऊ लागले. आपल्या विविध भाषिक रचनांच्या माध्यमातून नवे अविष्कार होऊ लागले. कवितांच्या रुपात आत्मकथनांच्या रुपात, दलित कवितेने पारंपारिक मराठी कवितेला धक्का दिला. गंगाधर गाडगीळांच्या नवकथेने फडके खांडेकर युगातील प्रस्थापित मराठी कथेला धक्का दिला. मराठी साहित्यात आतापर्यंत न आलेले अनुभव दलित साहित्यात व्यक्त होऊ लागले, प्रस्थापित मराठी साहित्यात 'आत्मचरित्र' हा वाङ्मय प्रकार रुढ होता दलित आत्मकथनांनी त्यालाही नवे वळण दिले. जन्मापासूनच्या अथपासून इतिपर्यंतचा इतिहासरुप जीवनवृत्तांत न देता आपण जे भोगले, अनुभवले सोसले ते कथन करायचे अशी भूमिका दलित आत्मकथनकारांनी घेतली त्यामुळे शतकानुशतके दडपून ठेवलेल्या भावना आदि अनुभव व्यक्त होऊ लागले. मानसशास्त्रीय दृष्ट्या दोन गोष्टी झाल्या. मनाच्या गुहेत दडपून राहीलेल्या भावना मोकळ्या होऊ लागल्या. मुक्तपणे व्यक्त होऊ लागला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणांनंतर निर्णायकी झालेल्या समाजाला पुन्हा मुक्ती लढ्याच्या दिशेने क्रांतीकारी नेतृत्व देण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला. दलित कविता दलित आत्मकथने लिहीली जात असताना दलित कथा, दलित कादंबरी, दलित नाटकेही लिहीली जाऊ लागली."

- **आण्णाभाऊ साठे -** गावकुसाबाहेर ज्यांचे अस्तित्व नाकारण्यात आले होते अशा दलित समाजातील मातंग जातीमध्ये आण्णाभाऊ साठे यांचा जन्म. वाटेगाव परिसरातील अस्पृश्यतेचे चटके त्यांनी अगदी लहानपणापासून सहन केले. दलित उपक्षितांचे एक प्रेरणास्थान म्हणून त्यांच्याकडे पाहीले जाते. एक हाडाचा कलावंत, लोकशाहीर, लावणी-पोवाडा लिहणारा कवी, गायक समाज परिवर्तनासाठी महाराष्ट्राला आंदोलन काळात लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, शाहीर गव्हाणकर, शाहीर अमरशेख या त्रिमूर्तीने महाराष्ट्रात वादळ निर्माण केले होते. आण्णाभाऊ साठे यांनी साहित्यातील विविध प्रकार हाताळले कथा, कादंबरी, नाटक,

प्रवासवर्णन, पोवाडे, लावणी, गीते लोकनाट्य अशा विविध साहित्यप्रकारांना त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून आकार दिला. या सर्व साहित्यातून त्यांनी गरीब शेतकरी, कष्टकरी, श्रमीक दलित उपक्षित यांच्या दुःखाला वाचा फोडली. सन १९५७ साली खुळंवाडी, बरबाद्या कंजारी, भानामती, फरारी, लाडी, गजाआड, आबी, कृष्णाकाठच्या कथा, चिरानगरिची भूतं निखारा, पिसाळलेला माणुस, गुऱ्हाळ हे कथा संग्रह प्रसिद्ध झाले.

- **शंकरराव खरात -** जन्म माणदेशातील आटपाडीत झाला. माणदेशात लहानाचे माठे झाले. बालपणी अनुभवलेला अनुभव अनुभवविश्व समृद्ध झाल्यानंतर तो परिसर, त्या परिसरातील माणसं त्यांनी आपल्या कथेतून शब्दबद्ध केली. बारा बलुतेदार (१९५९) तडीपार (१९६१) सांगावा (१९७७) लिलाव (१९९४) हे त्यांचे कथासंग्रह त्यांनी दलितांचे, उपेक्षितांचे, कष्टकऱ्यांचे बलुतेदारांचे पीडितांचे भटक्यांचे अतिशय पोटतिडकीने चित्रण केले. या संदर्भात डॉ. गंगाधर पानतावणे व चंद्रकुमार नळगे म्हणतात की, "खरातांचे कथालेखन विपुल आहे. समाजातील चित्रे ते शब्दबद्ध करतात. आण्णाभाऊ साठे यांच्या प्रमाणेच जे अनुभवले, पहिले तेच त्यांनी चित्रीत केले आहे. त्यांची निरीक्षण शक्ती जशी व्यापक तशी सुक्ष्महो आहे. म्हणूनच समाजजीवनातील समाजशास्त्रीय तपशील, देणारे खरात हे एकमेव कथाकार, ग्रामसंस्थेतील सृश्य आणि अस्पृश्य, तसेच ग्रामसंस्थेशी निगडीत असणाऱ्या उपेक्षीत समाजाचे चिंतन खरात अत्यंत सहहृदयतेने रेखाटतात. दलितांचे जीवन ज्या अंधश्रद्धानी विस्कटले आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनात निर्माण झालेले दुःख या संबधीचे अनेक करुण चित्रे त्यांच्या जीवनात निर्माण झालेले दुःख या संबधीची अनेक करुण चित्रे त्यांच्या कथेत शैथील्य निर्माण होते परंतु त्या कथेतील सामाजिक प्रश्न इतके दाहक आहेत की आशय हरवून बसत नाहीत खरातांची कथा संपन्न आशयाची वाहक आहे. ती बाह्य उपचारात गुरफटत नाही"[७]
- **बाबूराव बागुल -** बाबूराव बागूल हे मराठीतील ख्यातनाम दलित साहित्यीक म्हणून वाचकांच्या अभ्यासकांच्या परिचयाचे आहेत. त्यांनी कथा, कविता, कादंबरी वैचारीक वाङ्मय हे प्रकार समर्थपणे हाताळले. त्यांचे लेखन मराठी साहित्यात जागतिक साहित्यात मौलिक भर घालते. जेव्हा मी जात चोरली होती. (१९६६)'मरण स्वस्त होत आहे' (१९६९) हे त्यांचे दोन कथासंग्रह डॉ. बाबासाहेबांचे क्रांतीकारी तत्वज्ञान बाबूराव बागूल यांच्या केंद्रस्थानी आहे.
- **योगिराज वाघमारे -** एक समर्थ कथाकार उद्रेक (१९७९) बेगड (१९८०) गुडदाणी (१९८३) हे कथासंग्रह प्रसिद्ध आहे. प्रौढ दलित तरुणांची मनोव्यथा. दलित शिक्षकांच्या वाट्याला आलेले अपमान-उपेक्षा हे त्यांच्या कथांचे विषय आहेत.
- **वामन होवाळ-** वामन होवाळ हे महत्वाचे कथाकर असून त्यांनी प्रभावी व्यक्तिचित्रणे, आर्थिक संवाद, कथालेखनाची स्वतंत्र शैली. त्यांचे बेनवाड (१९७३) येळकोट (१९८२) वारसदार (१९८६) वाट आडवाटा (१९८८) हे कथासंग्रह मानवी जीवनातील व्यंगावर मार्मिकपणे भाष्य करणारे कथाकार आहेत. वामन होवाळ सामाजिक व सांस्कृतिक अंगाचे रोपण आपल्या कथातून सहजतेने करतात या प्रमाणे कमी अधिकप्रमाण अविनाश डोळस, डॉ. योगेंद्र मेश्राम, माधव कोंडविलकर इ. दलित कथाकारांनी कथालेखन केले आहे.
- **संदर्भ**


१. कालेकर द.बा. - 'साहित्याची कामगिरी', नवजीवन मुद्रणालय कालपूर अहमदाबाद, प्र.आ.१९४८ पृ.९

२. पुंडे द.दि. व तावरे स्नेहल - 'साहित्यविचार' स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे, १९९५ पृ १०२

३. लुलेकर प्रल्हाद जी. - 'वेदनांचा प्रदेश' कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद, २००० पृ. ५७

४. कुंभार प्रकाश - 'दलित साहित्य काही विचार आणि दिशा' कैलाश पब्लीकेशन औरंगाबाद, २००२ पृ. १४
५. प्रा. चंद्रकुमार नलगे, गंगाधर पानतावणे (संपा) दलित कथा, मेहता प्रकाशन पुणे, जुलै १९९४ पृ. ६
६. डॉ. सदा कऱ्हाडे 'दलित साहित्य चिकित्सा' स्वरुप प्रकाशन औरंगाबाद, प्र.आ. २००१ पृ.क्र. ६६,६७
७. प्रा. पानतावणे प्रा. नलगे (संपा) दलित कथा.- मेहता पब्लिशींग हाऊस पुणे, तृतीय आ. १९८८ पृ. १३,१४
८. डॉ. भालचंद्र फडके दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह श्रीविधा प्रका. पुणे, दुसरी आ. १९८९
९. प्रा. रा.ग. जाधव 'रक्ताळलेली लक्तरे' - योगेंद्र मेश्राम विजय प्रका. नागपूर १९८०